अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१ सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
☎ २४९२१२१२, २४९२२६१८
E-Mail : addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक २५.०७.२०२३

—: प्रेसनोट :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि | मुंबई विभाग |
| गु.नो.क्र | २७/२०२३ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता | श्री. निर्वाण त्र्यंबकराव तेलगोटे वय ४१ वर्षे, पद – दुय्यम अभियंता, टी वॉर्ड मुलूंड, घन कचरा व्यवस्थापन विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका मुलूंड, मुंबई ८०,<br>राठी :– सहजीवन सोसायटी, ४/९, भटवाडी बर्वे नगर, घाटकोपर (प), मुंबई ८४ |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ६,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/– |
| हस्तगत केलेली रक्कम | ४,०००/– |
| थोडक्यात हकिकत | बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय, मुलूंड टी विभागामार्फत स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान योजनेअंतर्गत ०१ जुन २०२३ पासून पुढील सहा महिन्याकरीता टेंडर काढण्यात आले होते. सदर टेंडर प्रक्रियेमधून फिर्यादी यांच्या पत्नीच्या " संजीवनी महिला बचत गटास" मुलूंड टी विभागातील स्वच्छता करणेबाबत टेंडर मिळाले होते.<br>सदर टेंडर मिळाल्यानंतर संजीवनी महिला बचत गटाने दिनांक ०१ जुन २०२३ पासून संबंधित विभागात स्वच्छतेचे काम चालू केले होते. परंतु मनपा टी विभागामार्फत सदर महिला बचत गटास वर्क ऑर्डर देण्यात आलेली नव्हती. सदर वर्क ऑर्डर शिवाय बचत गटास त्यांच्या कामाचे बिल टाकता येत नव्हते. म्हणून दिनांक ०५.०७.२०२३ रोजी यातील फिर्यादी हे म.न.पा " टी " विभागातील श्री. निर्वाण त्र्यंबकराव तेलगोटे, दुय्यम अभियंता यांना वर्क ऑर्डर घेण्याकरीता भेटले असता, त्यांनी फिर्यादीकडे वर्क ऑर्डर देणेकरीता रु.६,०००/– रुपये लाचेची मागणी केली. परंतू फिर्यादी यास लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई या कार्यालयास दिनांक २५.०७.२०२३ रोजी लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक २५.०७.२०२३ रोजी पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान वर नमुद लोकसेवकाने तडजोडीअंती ४,०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती घेण्याचे मान्य केली. त्यानंतर लगेच केलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक यांनी फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रुपये ४,०००/– स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. |

<u>मार्गदर्शन अधिकारी :</u> श्री विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग

सही/- २५/७/२३

( नितीन दळवी )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
**मुंबई विभाग,मुंबई**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा. <u>संपर्क :</u> लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभाग ९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३० <u>टोल फ्रि. क्र.</u> १०६४ <u>दुरध्वनी क्र.</u> ०२२ २४९२१२१२,<u>फॅक्स. क्र.</u> ०२२२४९२२६१८,

<u>संकेतस्थळ</u> : acbmaharastra.gov.in

<u>ई.मेल</u> : acbwebmail@mahapolice.gov.in, addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.,

<u>मोबाईल ॲप</u> : www.acbmaharastra.net., <u>फेसबूक</u> : www.facebook.com- Maharashtra ACB

Scanned with OKEN Scanner